शुक्रवार, दि. २३ मे २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २८७ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# वीज पुरवठ्याचा खेळखंडोबा थांबवा

## संतप्त शहर शिवसेनेचा एल्गार; आ. अर्जुनराव खोतकर यांच्या नेतृत्वात आंदोलनाची तयारी

**जालना । प्रतिनिधी -** गेल्या काही दिवसांपासून जालना शहर व परिसरात वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याच्या समस्येच्या मुद्द्यावर शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांनी आक्रमक भूमिका घेत, येत्या ८ दिवसात ही परिस्थिती सुधारा; अन्यथा महावितरणच्या प्रवेशद्वारावर आ. अर्जुनराव खोतकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना स्टाईलने ठिय्या आंदोलन करून एकाही अधिकाऱ्याला जागेवर बसू देणार नाही, असा खणखणीत इशारा दिला आहे.

या संदर्भात शिवसेनेचे शहरप्रमुख विष्णू पाचफुले यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने आज गुरुवार दि. २२ मे रोजी महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यास दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महावितरणचा कारभार अतिशय गलथान व बेजबाबदार झाला असून, नागरिकांचे जीवन विस्कळीत झाले आहे. हलका वारा किंवा पावसाच्या सरी सुरू होताच तासन्तास वीज गायब होते. ही बाब लाजिरवाणी असून महावितरणचे अपयश दर्शविणारी आहे.

२१ मे रोजी संपूर्ण शहरात रात्री ९ वाजल्यापासून ते अडीच वाजेपर्यंत वीजपुरवठा खंडित होता, दोन दिवसापूर्वी तब्बल २० तास जवळपास संपूर्ण शहराचा अभिषेक पुरवठा खंडित झाला होता, याचे उदाहरण देत विष्णू पाचफुले यांनी संताप व्यक्त केला. शहरातील बँकिंग सेवा, इंटरनेट, उद्योग, दैनंदिन व्यवहार ठप्प होण्याच्या स्थितीमुळे नागरिक त्रस्त आहेत. महावितरणने पावसाळ्यापूर्वी झाडांची छाटणी, धोकादायक तारा बदलणे, यंत्रणांची देखभाल याकडे पूर्णतः दुर्लक्ष केले असल्याचा आरोप या निवेदनात करण्यात आला आहे.

येत्या ८ दिवसांत परिस्थितीत सुधारणा झाली नाही, तर आमदार अर्जुनभाऊ खोतकर यांच्या नेतृत्वाखाली महावितरण कार्यालयावर शिवसेना स्टाईल ठिय्या आंदोलन करून अधिकाऱ्यांना घेराव घालत एकालाही जागेवर बसू देणार नाही, असा इशारा विष्णू पाचफुले यांनी या निवेदनात दिला आहे.

या निवेदनावर अंकुश पाचफुले, दीपक राठोड, मनोज लाखोले, विजय हजारी, युवराज ढसाळ, सिद्धार्थ अंभोरे, समाधान कांबळे, भग्गूभैया भगत, अमोल राक्षे, राम भुतेकर, आयुष राठोड, पांडुरंग खैरे, योगेश भगत, मंगेश गवारे, अंकुश शितोळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी आणि कार्यकारी अभियंत्यांना देण्यात आली आहे.



## वीजपुरवठा पहा; पाणी पुरवठा बंद होणार नाही - मनपा

**जालना -** सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे वारा-वादळाने वीजपुरवठा खंडीत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. शहरात नवीन जालना व जुना जालना अशा दोन झोन पद्धतीत एक तास प्रमाणे पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे वीजपुरवठा खंडीत झाल्यास तात्काळ नागरिकांनी एमएसईबी कार्यालयाशी संपर्क साधून वीज पुरवठा सुरळीत करावा पाणी पुरवठा बंद करण्याची मागणी करुन नये असे आवाहन जालना शहर महानगर पालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

## ऊन, पाऊस, थंडीत दिल्या जाणाऱ्या सेवेचा सार्थ अभिमान- डॉ. साबू

### रोटरी जालना इलाईटतर्फे फुटपाथ विक्रेत्यांना छत्र्यांचे वाटप

**जालना । प्रतिनिधी -** हातावर पोट असणारे अनेक जण रस्त्याच्या कडेला व्यवसाय करतात. त्यांच्याकडून उन्हातान्हात, पावसात आणि थंडीतही जनतेला दिल्या जाणाऱ्या या सेवेचा आम्हाला अभिमान आहे. जगातील कोणतेही काम लहान, मोठे नाही. लहान काम करणारा कसा मोठा होईल, यासह समाजाच्या गरजा ओळखून त्यावर काय करता येईल, यावर रोटरीचे सदैव चिंतन सुरू असते. त्याचदृष्टीने रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांचे ऊन आणि पावसापासून संरक्षण व्हावे या हेतूने रोटरी क्लब जालना इलाईटने छत्र्या वाटपाचा राबविलेला उपक्रम अत्यंत प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन रोटरीचे प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांनी येथे केले.

रोटरी क्लब ऑफ इलाईटच्यावतीने गुरुवार दि. २२ मे रोजी १५ फूटपाथ विक्रेत्यांना डॉ. साबू यांच्याहस्ते छत्र्या प्रदान करण्यात आल्या, त्याप्रसंगी ते बोलत होते. प्रारंभी क्लबचे अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल यांनी या उपक्रमाचा उद्देश विषद करून, छत्र्यामुळे रस्त्यावर पान ३ वर



युवा आदर्श

### नेटकरी ...

**हॅपी बर्थडेचा मेसेज**
**कुणा एकाला करावा**
**फॉरवर्डवाले नेटकरी**
**घालू लागती भरावा**
**विश्वास सहज बसावा**
**मेसेज असाचं असावा**
**लावून लोकां कामास**
**मजेत घ्यावा विसावा**
**शुभेच्छांचा तो पाऊस**
**जोरा जोरात बरसावा**
**गौप्यस्फोट दणक्यात**
**चाणाक्ष सुध्दा फसावा**
**प्रत्येक पोष्ट फॉरवर्ड**
**विरह कसा रे सोसावा**
**असा सोडायचा बाण**
**वर्मावर जावून घुसावा**
**फॉरवर्ड करणे नादात**
**बॅकवर्ड होतो माणसा**
**विचार शक्तीचं खुंटली**
**अविचार असा कसा**
**पहिला मेसेज आपला**
**पुसून टाकावा पुरावा**
**भल्या नाते संबंधात**
**उगाचं नकोयं दुरावा**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

### भाजपा नेते मुरलीधर चौधरी यांचे निधन

## जीवाभावाचा सहकारी गमावल्याचे दुःख - आ. लोणीकर

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते मुरलीधरआण्णा चौधरी यांच्या अकस्मात निधनाने जालना जिल्ह्यातील भाजपा कार्यकर्त्यांमध्ये शोककळा पसरली आहे. या दुःखद प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तसेच परतूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांनी आपेगाव येथे चौधरी कुटुंबीयांची सांत्वनपर भेट घेऊन आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी त्यांनी स्व. चौधरी यांच्या पक्षासाठी दिलेल्या योगदानाचा आणि त्यांच्या आदर्श गुणांचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

आमदार बबनराव लोणीकर यांनी चौधरी कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले, जीवाभावाचा सहकारी गमावल्याचे दुःख अनावर आहे. स्व. मुरलीधरआण्णा चौधरी यांनी भारतीय जनता पक्षाचे संघटन मजबूत करण्यात सिंहाचा वाटा उचलला होता. त्यांच्या अकस्मात निधनाने पक्षात आणि जालना जिल्ह्यात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. स्व. चौधरी यांच्या कार्याची आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाची थोरवी सांगताना लोणीकर यांचे कंठ दाटून आले. त्यांनी पुढे सांगितले की, स्व. चौधरी यांच्या निधनाने केवळ पक्षाने नव्हे, तर संपूर्ण समाजाने एक प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष नेतृत्व गमावले आहे.

आमदार लोणीकर यांनी स्व. चौधरी यांच्या चांगल्या गुणांचा उल्लेख करताना उपस्थितांना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख करून दिली. ते म्हणाले, स्व. मुरलीधरआण्णा नेहमी सत्य बोलायचे आणि त्यांच्या कृतीत पारदर्शकता ठेवायचे. त्यांच्यामध्ये इतरांप्रती करुणा आणि सहानुभूती होती. स्वतःच्या यशाचा अभिमान न बाळगता ते नेहमी इतरांचा आदर करायचे. प्रतिकूल परिस्थितीत पान ३ वर



## मनपातील टेंडरच्या जाहीराती एकाच वृत्तपत्रात

### अतिरिक्त आयुक्तावर आ. गोरंट्याल यांचे गंभीर आरोप



**जालना । प्रतिनिधी -** जसे आमदार अर्जुनराव खोतकर यांचे डमरू वाजेल तसे अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत काम करतात असा गंभीर आरोप माजी आ. कैलास गोरंट्याल यांनी एका पत्रकार परिषदेतून केला आहे.

अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत यांची नगरविकास विभागाकडे तक्रार करणार असल्याचेही यावेळी माजी आ. गोरंट्याल यांनी स्पष्ट केले. ते हॉटेल अंबर येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

महानगर पालिकेच्या माजी आ. गोरंट्याल यांनी म्हटले की, अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत यांनी खोतकरांच्या लोकांना खुष करण्याचं काम केले आहे. महापालिकेचे टेंडरबाबत दर्शनाहुन जेवढा आदेश येईल तेवढेच होते असेही गोरंट्याल यांनी म्हटले आहे. महानगरपालिकेचे टेंडर काढतांना दोन वर्तमानपत्रातून जाहीरात प्रसिद्ध करावी लागते. मात्र, पान ३ वर

### शंखनाद महोत्सव : ‘सनातन राष्ट्राची सुरक्षा’ उद्बोधन सत्र !

## राष्ट्राचे रक्षण शस्त्रानेच करावे लागते ! - मेजर गौरव आर्य

**फोंडा, गोवा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवलेनगरी) -** राष्ट्राचे रक्षण शस्त्रानेच करावे लागते. साधूसंतांच्या रक्षणासाठी श्रीरामाचा जन्म झाला. मुघलांचे आक्रमण वाढल्यानंतर हिंदूंच्या रक्षणासाठी छत्रपती शिवाजी महाराज, गुरुगोविंदसिंग यांचा जन्म झाला. सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात हिंदूंच्या रक्षणासाठी प्रभु श्रीराम पुन्हा अवतीर्ण झाल्याचा साक्षात्कार होत आहे, असे वक्तव्य ‘चाणक्य फोरम’चे मुख्य संपादक तथा सेवानिवृत्त मेजर गौरव आर्य यांनी केले. ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा’त ‘सनातन राष्ट्र आणि सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांचे विविधांगी कार्य’ या सत्रात ‘सनातन राष्ट्राची सुरक्षा’ या विषयावर गौरव आर्य यांनी विचार मांडले.

या वेळी व्यासपिठावर स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष श्री. रणजित सावरकर, पंजाब गोरक्षक दलाचे संस्थापक अध्यक्ष श्री. सतीश प्रधान, सनातन संस्थेचे धर्मप्रचारक सद्गुरु नंदकुमार जाधव आणि हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र व छत्तीसगड राज्याचे समन्वयक श्री. सुनील घनवट उपस्थित होते.

**हिंदू बलशाली होण्याकडे दुर्लक्ष केल्यानेच देशाचे अवमूल्यन ! - रणजित सावरकर**

‘हिंदूंचे राजनितीकीकरण आणि राजनीतीचे सैनिकीकरण होणे आवश्यक आहे. हिंदू बलशाली व्हायला हवेत. स्वातंत्र्यानंतर देशात सत्तेवर आलेल्या सरकारने याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे देशाचे अवमूल्यन झाले. त्या काळात सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांनी हिंदूंच्या संघटनाला प्रारंभ केला. सनातनच्या गोवा येथील आश्रमात आल्यावर मला सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांच्या आध्यात्मिक कार्याची प्रचिती आली. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले असे एकमात्र व्यक्ती आहेत, जे राष्ट्राला दिशा देण्यासाठी कार्य करत आहेत. हिंदूंना बळशाली करण्यासाठी कार्य करणारे सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले करत आहेत, असे स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे कार्याध्यक्ष श्री. रणजित सावरकर यांनी या वेळी म्हटले.



या वेळी श्री. सुनील घनवट म्हणाले, ‘‘हिंदूंना धर्मशिक्षण प्राप्त व्हावे, यासाठी हिंदु जनजागृती समितीने धर्मशिक्षणवर्ग चालू केले. सद्यस्थितीत देशात समितीच्या वतीने ५०० ठिकाणी धर्मशिक्षणवर्ग चालू आहेत. समितीने समाजाला दिशा देण्याचे कार्य केले आहे.’’ सनातन संस्थेचे सद्गुरु नंदकुमार जाधव म्हणाले, ‘‘सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी साधकांना मार्गदर्शन करून जगभर अध्यात्मप्रसार केला आहे. तसेच नृत्य, गायन, संगीत याद्वारे अध्यात्मिक प्रगती कशी करायची याचे मार्गदर्शन त्यांनी केले.’’ पंजाब गोरक्षक दलाचे संस्थापक अध्यक्ष श्री. सतीश प्रधान म्हणाले की, महाराष्ट्रात गोमातेला राज्यमातेचा दर्जा देण्यात आला, त्याप्रमाणे हिंदूंच्या आस्थेचा विचार करून सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाच्या निमित्ताने गोवा सरकारनेही गोमातेला राज्यमातेचा दर्जा द्यावा.

**संपादकीय**

# कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करा

आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक कासव दिन म्हणून साजरा केला जातो. १९९० पासून हा दिवस संपूर्ण जगात साजरा केला जातो. आपल्या संस्कृतीत कासवाला खूप मानाचे स्थान आहे. हिंदू संस्कृतीत तर कासवाला देवाचे रूप मानले जाते. हिंदू धर्माच्या मंदिराच्या बाहेर तर कासवाची प्रतिकृती आवर्जून असते. देवाचे दर्शन घेण्याआधी भाविक कासवाचे दर्शन घेतात. आपले पूर्वज कासवाचा सांभाळ करत असत. प्रत्येक नदी, विहीर, बारव तलावात कासव वास्तवात असे, पण आज कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. कारण शिकार, व्यापार आणि पाण्याच्या अभावामुळे कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. अनेक दुर्मिळ जातींच्या कासवांचे अस्तित्व नष्ट झाले आहे. आज गोड्या पाण्यातून तर कासवे हद्दपारच झाले आहेत. कासवांचे अस्तित्व आता फक्त समुद्रातच पाहायला मिळते. कासव हा उभयचर प्राणी आहे. पाणी आणि जमीन अशा दोन्ही ठिकाणी कासव राहू शकतो. कासवाचे पोट आणि पाठ खूप टणक असते. समुद्रात राहणाऱ्या कासवाचे सात प्रकार आहेत त्यापैकी भारतात चार प्रकार पाहायला मिळतात. ऑलिव्ह रिडले कासव, ग्रीन टर्टल, हॉक्स बिल टर्टल आणि आणि सागरी कासव हे ते चार प्रकार आहेत. ऑलिव्ह रिडले कासव हे तपकिरी रंगाचे असून ते महाराष्ट्र आणि ओरिसाच्या समुद्रकिनाऱ्यावर आढळतात. ग्रीन टर्टल कासव म्हणजे हिरव्या रंगाचे कासव हे पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर आढळतात. हॉक्स बिल टर्टल म्हणजे चोची सारखे तोंड असलेले कासव अंदमान निकोबारच्या बेटावर आढळतात तर सागरी कासव हे सर्व समुद्रात आढळतात. समुद्रातील कासवांची देखील आता मोठ्या प्रमाणात शिकार होऊ लागली आहे. कासवांच्या पाठीचा दागिन्यांसाठी वापर केला जातो. तसेच कासवांच्या पाठिपासून ढालीही बनवल्या जातात. चामड्याच्या तसेच शोभेच्या वस्तू बनवण्यासाठी कासवांच्या त्वचेचा वापर केला जातो. काहीजण आपल्या घरात शोभेसाठी कासव पाळतात. या सर्व कारणांनी कासवांची शिकार होते. कासवांची शिकार बेकायदेशीर असूनही कासवांची शिकार होते हे विशेष. कासवांचे संवर्धन करण्यासाठी वेळास येथे कासव संवर्धन केंद्र उभारण्यात आले आहे. वेळास येथे दरवर्षी कासव महोत्सवही आयोजित केला जातो. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऑलिव्ह रिडले कासवांचे प्रजनन आणि संवर्धन होते. कासवांचे आयुष्य १०० ते १५० वर्ष इतके असते. मात्र शिकारीमुळे अनेक कासवे अकालीच मरण पावतात. कासवांचे अस्तित्व जमीन आणि पाण्यातील जीवनसाखळीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. कासवांचे अस्तित्व टिकणे ही काळाची गरज आहे. जर पृथ्वीवरून कासवांचे अस्तित्व नष्ट झाले तर त्याचा पर्यावरणावर मोठा परिणाम होऊ शकतो. कासव हा वन्यजीव असल्याने त्याला घरात बंदिस्त करणे, त्याची हत्या करणे, शिकार करणे हे वन्यजीव कायद्यानुसार गुन्हे आहेत त्यामुळे असे गुन्हे करताना कोणी आढळल्यास त्याची पोलिसांकडे तक्रार करणे हे देशातील नागरिकांचे कर्तव्य आहे. कायद्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे, कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हाच जागतिक कासव दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. हा उदेश यशस्वी व्हावा असे वाटत असेल तर प्रत्येकाने कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करायला हवे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# इतिहासाचा अभ्यास करताना

आपण बऱ्याच वेळा ऐकले आहे की अनेक भारतीय राजे युद्धात जिंकायचे पण तहात हरायचे किंवा युद्धात पराभव दिसत असल्यास यशस्वी माघार कशी घ्यावी याची कोणतीही योजना त्यांनी अखल्याचे दिसत नाही. पण ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाबतीत हे कधीच घडले नाही. त्यांनी आखलेल्या प्रत्येक योजनेत जर आपला पराभव होणार असेल किंवा काही दगा- फटका झालाच तर पुढे काय करायचे याचा विचार व तशा सूचना त्यांनी आपल्या सर्वच महत्त्वाच्या सहकाऱ्यांना दिलेल्या असे. अफजलखानाचा वध व आग्र्याहून सुटका यासारख्या अनेक प्रसंगांमध्ये याबद्दलचे स्पष्ट पुरावे मिळतात. बादशाहकडून आपल्याला अटक होईलच हे आधी माहीत नसतानाही अटक झालीच तर बाहेर कसं पडायचं आणि कशाप्रकारे महाराष्ट्रात परत यायचं याबद्दलचं आधीच नियोजन केलेलं असल्याचं आपल्याला अनेक ऐतिहासिक दस्तऐवजांवरून दिसून येतं. अफजलखानाच्या भेटीस जातांना सुद्धा काही विपरीत घडले तर पुढे काय करावे याबद्दलच्या सर्व सूचना त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना दिलेल्या होत्या.

छत्रपती शिवाजी महाराजांनी बादशाहच्या काळकोठडीतून स्वतःची सुटका कशी करून घेतली, हा एक खूप कठीण प्रसंग होता. याबद्दल आज उपलब्ध माहितीनुसार ही एक घटना महाराजांच्या कार्य कौशल्याची, दृष्टिकोनाची, योग्य निर्णय क्षमतेची, माणसं जोडण्याच्या प्रक्रियेची, आपल्या सभोवताली असणाऱ्या माणसांमध्ये आपल्याबद्दल विश्वास निर्माण करण्याची, त्यांना आपलसं करण्याची, अगदी यातून दिल्लीचा बादशाह औरंगजेब हा सुद्धा सुटला नाही याची आपल्याला सतत जाणीव होत राहते, पहारेकरी वर्ग, त्याचे प्रमुख, बादशाहच्या दरबारातील दरबारी मंडळी व स्वतः बादशाह या सर्वांच्या प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष किंवा अनावधानाने मिळालेल्या सहकार्यामुळेच हे शक्य झाले असेल आणि असे हे सहकार्य मिळवण्यात आपल्या बुद्धीचातुर्याने यशस्वी झालेले छत्रपती शिवाजी महाराज हे एक विलक्षण उदाहरण असल्याचं आपल्या सहज लक्षात येतं. बादशाहने महाराजांना जेव्हा काळकोठडीत बंद केले आणि त्यानंतर छत्रपतींनी जो विचार केला, तो ज्या पद्धतीने केला- 'बालपणी आपल्या आईकडून ऐकलेल्या रामायण- महाभारतातील गोष्टींचा संदर्भ या ठिकाणी आपल्याला येऊ शकेल. महाभारतातील एका प्रसंगात अशाच प्रकारे लाक्षागृहामध्ये पांडवांना मारण्याचा जो एक अघोरी डाव रचला होता. त्यातून पांडव कसे बाहेर पडले याची काहीशी आठवण महाराजांच्या या आग्रा सुटकेतून दिसून येते. वर्तमानातील समस्यांचा सामना करताना भूतकालीन घटनांचा कसा उपयोग करायचा असतो, इतिहासातून नेमके काय आणि कसे शिकावे ही जी नवी दृष्टी आपल्याला महाराजांनी शिकवली, त्याचा खऱ्या अर्थाने आज आपण स्वीकार करण्याची गरज आहे. इतिहासाचा अभ्यास करताना आपण आपली दृष्टी कशी ठेवली पाहिजे याचं हे एक मूर्तीमंत उदाहरण आहे.

पण आम्हीं इतिहासापासून काहीच शिकत नाही, उलट तो सतत आपण विसरताना दिसतो किंवा तो जाणून घेण्याची किंवा समजून घेण्याची आपली मानसिकता नसते. त्यामुळेच इतिहासात घडलेल्या चुका पुन्हा-पुन्हा होताना दिसतात. याची अनेक उदाहरणे इतिहासात मिळतात. तशीच ती वर्तमानतही दिसतात. पृथ्वीराज चव्हाण यांनी मुहम्मद घोरिला युद्धात अनेक वेळा पराभूत केले होते. प्रत्येक वेळी त्याला शरण आला किंवा दयेची याचना केली म्हणून सोडून दिले किंवा त्याला पळून जाऊ दिले. आपण परकीय अक्रमकांवर पराभूत केल्यावर अन्याय, अत्याचारही नाही केला. तोच मुहम्मद घोरी जेंव्हा पृथ्वीराज चव्हाणांना पराभूत करतो व पकडतो तेव्हा तो त्यांना सोडत नाही. त्यानंतर दक्षिण भारतातील समृद्ध अशा विजयनगरच्या साम्राज्यानेही बहामणी राजांना अनेक वेळा पराभूत केले होते. पण जेव्हा १५६५ च्या तालिकोटच्या युद्धात बहामनींचा विजय होतो तेव्हा ते पुढील सहा महिने विजयनगरची भयंकर लूट करतात ती इतकी असते की पुढे त्या प्रदेशाचे जंगलात रूपांतर होते. अगदी अलीकडच्या कालखंडात म्हणजे दुसऱ्या महायुद्धानंतर जगात अनेक युद्धे झालीत. त्या युद्धांचा जरी आपण अभ्यास केला तर तिथे ज्या प्रकारे युद्धानंतर करार करण्यात आले त्या करारांचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. उदा. अमेरिका-इराक युद्ध, शीतयुद्ध. कारण गेल्या सात दशकांमध्ये आपण पाकिस्तानला अनेक वेळा पराभूत केले व करार करून युद्ध थांबवले. पकडलेले सैनिकही सोडून दिले. पण कल्पना करा की जेव्हा आपल्या दुर्दैवाने एखाद्या युद्धात पाकिस्तानचा विजय झाला तर तो आपल्याशी याच प्रकारे वर्तन करेल याची खात्री देता येईल का? आपली इतिहास न अभ्यासण्याची व इतिहासाच्या अभ्यासातून योग्य बोध न घेण्याची दृष्टी दिसते.

**प्रा.प्रशांत शिरुडे**
**के.रा.कोतकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय डोंबिवली.**
prashantshirude1674gmail.com
**९९६७८१७८७६**

# उज्ज्वल भविष्यासाठी चांगले कर्म आवश्यक

आजकाल प्रत्येकजण आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी वाटचाल करताना दिसत आहे. प्रत्येकालाच आपले भविष्य खूप उज्ज्वल आहे, असे वाटत आहे. म्हणून प्रत्येकजण भविष्यावर विश्वास ठेवून आणि वर्तमनात अनेक अपेक्षा बाळगून जगत आहे. त्यासाठी प्रत्येकालाच वाटत आहे की, मी भविष्यात खूप मोठा होणार आहे. भविष्यात माझ्याकडे खूप पैसा व संपत्ती असणार आहे. भविष्यात मी खूप मोठ्या उंचीवर जाणार आहे. भविष्यात मला खूप मोठी नोकरी मिळणार आहे. भविष्यात माझा खूप मोठा व्यवसाय असणार आहे. अशा एक ना अनेक अपेक्षा घेऊन आजकालचा माणूस भविष्याची वाटचाल करताना दिसत आहे. पण खरंच सगळ्यांच्या भविष्यकालीन अपेक्षा पूर्ण होतील का? सगळ्यांच्याच भविष्यात यशाचा प्रकाश पडेल का? आणि सगळ्यांचेच भविष्य तेजस्वी ताऱ्याप्रमाणे उज्वल असेल का? या प्रश्नांचा विचार केल्यावर आपल्या असे लक्षात येईल की, जर आपल्याला आपले भविष्य उज्ज्वल रहावे असे वाटत असेल, आपल्या भविष्यात यशाचा व सुखाचा पाऊस पडावा असे वाटत असेल तर आपल्याला अगोदर कर्म चांगले करावे लागतील. कारण ज्या माणसाचे कर्म चांगले असतात, त्या माणसाचा भविष्यकाळ नक्कीच उज्ज्वल असतो. पण आजकाल उज्वल भविष्यासाठी बहुतांश माणसांचे वर्तमानातील कर्म म्हणावे तेवढे चांगले नाहीत. म्हणून आजकालच्या बहुतांश माणसांचा भविष्यकाळ म्हणावा तेवढा उज्वल नाही. माणसाचे उज्ज्वल भविष्य हे त्याच्या वर्तमानातील कर्मावर अवलंबून असते. वर्तमानात जेवढे चांगले कर्म कराल, तेवढा तुमचा भविष्यकाळ चांगला असेल. आणि जेवढे वाईट कर्म कराल तेवढा तुमचा भविष्यकाळ तुम्हाला दुःखदायक असेल. म्हणून आपण चांगले कर्म करून आपले भविष्य उज्ज्वल व प्रकाशमान केले पाहिजे. त्यासाठी आपल्याला परोपकारी व दानशूर बनून अडचणीत व संकटात सापडलेल्या लोकांना मदत करावी लागेल. मानवता हाच खरा धर्म मानून माणसाशी माणसाप्रमाणे वागावे लागेल. आर्थिक अडचणीत सापडलेल्या गरजूंना शक्य होईल तेवढी आर्थिक मदत करावी लागेल. दुःखी व पीडित लोकांचे अश्रू पुसून त्यांना मायेचा आधार द्यावा लागेल. एकमेकांच्या सुखदुःखात वाऱ्यासारखे धावून जावे लागेल. सामाजिक क्षेत्रात स्वतःला झोकून देऊन काम करावे लागेल. गोरगरीब व वंचित मुलींच्या लग्नाला थोडाफार हातभार लावावा लागेल. रस्त्याने जात असताना एखादा अपघातग्रस्त व्यक्ती दिसल्यावर त्याचा फोटो न काढता अगोदर त्याला रुग्णालयात दाखल करून त्याचा जीव वाचवणे हे देखील उज्ज्वल भविष्यासाठी चांगले कर्म ठरू शकते. वृद्धाश्रमांना व अनाथाश्रमांना विविध जीवनावश्यक वस्तू, अन्न व कपडे देऊन मायेचा आधार देणे हे देखील उज्ज्वल भविष्यासाठी एक महत्त्वपूर्ण काम ठरू शकते. ज्यांना रक्तदानाची व अवयव दानाची नितांत गरज आहे, ते दिल्याशिवाय ज्यांचा जीव वाचू शकत नाही, अशा व्यक्तींना रक्तदान व अवयव दान करून जर त्यांचा आपण जीव वाचवला तर ते उज्ज्वल भविष्यासाठी अतिशय महत्त्वाचे काम ठरू शकते. अशाप्रकारे गरजवंतांना आपण आपापल्या परीने मदत करून चांगले व निकोप कर्म करत राहिलो तर नक्कीच आपला भविष्यकाळ उज्ज्वल आहे. असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. ज्या ज्या व्यक्तींनी वर्तमानात चांगले काम करून उज्ज्वल भविष्याचे स्वप्न पाहिले, त्या व्यक्तींचे भविष्य खरोखरच उज्वल व प्रकाशमान झाले आहे. त्यांच्या जीवनातील अंधार नाहीसा होऊन उज्ज्वल भविष्याची मंगलमय पहाट उगवली आहे. त्यांचे भविष्य एखाद्या तेजस्वी ताऱ्याप्रमाणे आजही चमकत आहे. अशा उज्वल भविष्य घडवणाऱ्या तेजस्वी ताऱ्यांचा नामोल्लेख मला आवर्जून करावा वाटत आहे. महान विचारवंत तथागत गौतम बुद्ध, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, आरक्षणाचे जनक राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व अण्णाभाऊ साठे या महापुरुषांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून गोरगरीब व तळागाळातील लोकांच्या जीवनाला कलाटणी दिली. त्यांच्या जीवनात सुखाची व आनंदाची मंगलमय पहाट आणली. आणि त्यांच्यासाठी आपले उभे आयुष्य खर्ची घालून त्यांना मूलभूत हक्क व अधिकार बहाल केले. म्हणूनच त्यांचे भविष्य चकाकणाऱ्या बावनकशी सोन्याप्रमाणे तेजस्वी व प्रकाशमान झाले आहे. आज या महापुरुषांना जगाचा निरोप घेऊन खूप वर्ष लोटली आहेत. तरीही या महापुरुषांच्या नावाचा जयजयकार आजही संपूर्ण जगात होत आहे. आज अनेक देशातील लोक या महापुरुषांची प्रेरणा घेऊन आपले भविष्य उज्ज्वल व प्रकाशमान करत आहेत. आणि आपल्या देशाचे भवितव्य घडवत आहेत. म्हणून आमच्या युवकांनी कुठेही भरकटत न जाता आपल्या महापुरुषांचा आदर्श घेऊन खूप खूप चांगले काम करावे. शैक्षणिक प्रवाहात टिकून राहून चांगला अभ्यास करावा. सेवाभाव, परोपकार व दायित्व हे गुण आत्मसात करून आपण भविष्याची वाटचाल केली पाहिजे. तेव्हा नक्कीच आपले भविष्य उज्ज्वल व प्रकाशमान झाल्याशिवाय राहणार नाही....

**बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर मो.७४९८७१५६६१**

# चळवळीचे कार्य अशाच व्यक्ती करू शकतात ज्यांची समज, दृष्टी विकसित झालेली असते - बी. बी. मेश्राम

## फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची ११० वी शतकोत्तर वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा संपन्न

**छत्रपती संभाजी नगर । प्रतिनिधी -** फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, गंगाधर गाडे प्रतिष्ठान व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे नागसेन विद्यालय, पीरबाजार, उस्मानपुरा, छत्रपती संभाजी नगर येथे फुले शाहू आंबेडकराईट चळवळीची स्थिती समजून घेण्यासाठी बहुजन चळवळ : काल, आज आणि उद्या. या विषयावर ११० वी वैचारीक प्रबोधनात्मक विशेष कार्यशाळा १७ मे २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, आता केवळ मिनिमम कॉमन नव्हे तर मॅक्झिमम कॉमन प्रोग्रामवर एकत्रित येऊन कार्य केले पाहिजे. नामविस्ताराने नामांतर आंदोलनाची सांगता झाली, पुढे काय? याचा शोध घेताना के. जी. टू पी. जी. सह पीएचडी. पर्यंतच्या अभ्यासक्रमात बुद्ध, फुले शाहू आंबेडकरांच्या परिवर्तनवादी विचारांचा समावेश करण्यासाठी लढा दिला पाहिजे. राजाश्रय असताना चळवळ चालविणे सोपे असते तर राजाश्रय नसताना चळवळ चालविणे जिकिरीचे असले तरी महत्त्वपूर्ण असते. चळवळ चालविण्यासाठी मानवीय व आर्थिक संसाधनाचे इंधन आवश्यक आहे. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या आदेशानुसार आपण आपल्या सर्व स्त्रोतातील ऊर्जेचा, उत्पन्नाचा २० वा हिस्सा प्रदान केला पाहिजे.

बहुतांश वेळा सर्व काही झाले पाहिजे म्हणून अनेक जण अपेक्षा व्यक्त करतात. शासनकर्ती जमात झाले पाहिजे असे अनेकांना वाटते पण आवश्यक कृती कार्यक्रम कसा राबवायचा? यावर मात्र कुणी बोलताना दिसत नाहीत? ज्याचे दुष्परिणाम समाजाला भोगावे लागत आहेत. रिकाम्या पोटी चळवळीचे कार्य करणे शक्य नसले तरी पोट भरलेली माणसं तरी कुठे कार्य करताना दिसतात? याचा अर्थ चळवळीचे कार्य अशाच व्यक्ती करू शकतात ज्यांची समज, दृष्टी (Vision of Understanding) विकसित झालेली असते. म्हणून आपण प्रासंगिकतेचे भान ठेवून सामान्य कार्यकर्त्यांची दृष्टीकोनात्मक समज विकसित करण्यासाठी बहुजन चळवळ : काल, आज आणि उद्या या विषयावर उपाययोजनांच्या दृष्टीकोनातून चर्चा करीत आहोत.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्ते सुभाष ठोकळ म्हणाले की, हा विषय आपल्या अस्तित्वाचा प्रश्न असल्यामुळे भूतकाळापासून प्रेरणा घेऊन पुढील वाटचाल केली पाहिजे. चळवळीला यश मिळण्यासाठी राजाश्रयाची आवश्यकता असते. ज्यात कायदे निर्माण करून अंमलबजावणी केली जाते. राजकीय सत्ता ही सर्व समस्यांची गुरुकिल्ली आहे. आपापसांतील संघर्ष टाळून शत्रूच्या विरोधात लढा दिला पाहिजे.

प्रमुख वक्ते म्हणून बोलताना जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती मारुती साळवे म्हणाले की, शत्रू अहोरात्र कार्यरत असल्याने आपण वेगाने गतिमान झाले पाहिजे. वारकरी संप्रदायाचे आंदोलन बहुजनांसाठीच होते. ओबीसी समूह शत्रूचा वाहक असल्याने आपली वाताहात होत चालली आहे. २४ सप्टेंबर १८७३ ला राष्ट्रपिता ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली होती. तसेच २४ सप्टेंबर १६७४ ला शिवाजी महाराजांचा द्वितीय राज्यभिषेक शाक्त पद्धतीने संपन्न झाला होता. येणाऱ्या काळात या दोन्ही घटनांचा विचार महोत्सव साजरा केला पाहिजे. आपण राजकारणाच्या अनुषंगाने फार अनभिज्ञ आहोत. समस्या निर्मूलनावर चर्चा करण्यासाठी किमान महिन्यातून एकदा तरी एकत्र आले पाहिजे.

विशेष मार्गदर्शक गंगाधर गाडे प्रतिष्ठान चे अध्यक्ष विलास कटारे म्हणाले की, या शहराला आकार आणि उकार देण्याचे कार्य चळवळीच्या माध्यमातून गंगाधर गाडे साहेबांनी केले आहेत. ७ जुलै १९७७ ला गाडे साहेबांनी नामांतरासाठी विद्यापीठाला पत्र दिले होते. त्याग आणि समर्पणाचे दुसरे नांव म्हणजे गंगाधर गाडे होय.

याप्रसंगी प्रवीण गाडेकर म्हणाले की, कार्यकर्ता सक्षम झाला तर तो चार दोन जणांना उभ करू शकेल. सिद्धार्थ पवार म्हणाले की, वर्तमानात चळवळीची वाताहात होत चालली असून उद्याची चळवळ कशी असेल? ही गंभीर बाब आहे. सर्जेराव मनोहरे म्हणाले की, रिकाम्या पोटी क्रांती होत नसते.

चळवळीला मरगळ आली आहे. गंगाधर गाडे साहेबांनी आम्हाला चळवळीचे बाळकडू पाजले आहे. संतोष खरात म्हणाले की, फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या संपर्कात आल्यामुळे बोलता येऊ लागले आहे. आपल्या अनेक बुद्ध विहारात फक्त वंदना होते म्हणून अशा कार्यशाळांचे आयोजन करून चळवळीचे पुनरुज्जीवन केले पाहिजे. एड. डी. बी. मेश्राम म्हणाले की, किमान समान कार्यक्रमांतर्गत एकत्रित येऊन कायदेशीर सहकार्याने परिणामकारक चळवळ चालविली पाहिजे. शैलेंद्र मिसाळ म्हणाले की, चळवळ सोडायचे कुणाच्या मनात आले तरी चळवळ मात्र त्यांना सोडत नसते. साडी, माडी व गाडीत व्यस्त असणारे शेणातले किडे आहेत. चळवळीला धार येण्यासाठी त्याग करावा लागेल. लेखक संतोष लेंभे म्हणाले की, आपण शिक्षणात पुढे असलो तरी व्यवस्थेत कुठे आहोत?

प्रास्ताविक एड. विलास रामटेके तर सुत्रसंचालन महादेव डांबरे यांनी केले. सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर गाडे प्रतिष्ठान व स्टडी सर्कलच्या वतीने उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. या कार्यशाळेला एड. विलास रामटेके, दीपक पगारे, बी. बी. मेश्राम, सुभाष ठोकळ, प्राचार्य विलास कटारे, प्रवीण गाडेकर, सिद्धार्थ पवार, सर्जेराव मनोरे, राकेश साबळे, अजय दाभाडे, संतोष खरात, मारुती साळवे, लता थोरात, शीला मोरे, शैलेंद्र मिसाळ, डी. बी. मेश्राम, संजय बनसोडे, एड. यु. एस. डोंगरे, पत्रकार राजू पडवळ, पत्रकार भानुदास मते, पत्रकार गौतम घाटसरे, लेखक संतोष लेंभे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने कार्यशाळा हर्षोल्हासात संपन्न झाली.

# शेतकऱ्यांनी 'सस्ती अदालत' उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** विभागीय आयुक्त यांच्या परिपत्रकानुसार मराठवाडा विभागातील आठ जिल्ह्यातील विभागीय आयुक्त कार्यालयास भेट देणाऱ्या नागरिकांच्या बहुतांश तक्रारी या शेतरस्ते, पाणंद रस्ते यावरील अतिक्रमणाबाबत असल्याचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या निदर्शनास आले होते. त्यानुसार विभागातील सर्व संबंधित नागरिकांना विभागीय आयुक्त यांच्याशी थेट संवाद साधण्यासाठी वेबिनारद्वारे संवाद साधला. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी सहभाग व शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करुन देण्याची मागणी केली. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदी, मामलेदार कोर्ट अधिनियम १९०६ मधील तरतुदी आणि वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या रस्त्यांची प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढणेबाबत निर्देशाच्या अनुषंगाने विभागात शेतरस्ते/पाणंद रस्ते अतिक्रमणाबाबत प्रभावी कार्यवाही करणे गरजेचे आहे. तसेच सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालय यांच्या निर्देशानुसार विभागस्तरावर व जिल्हास्तरावर वेळोवेळी प्रलंबित न्यायालयीन प्रकरणात तडजोड करून जलद गतीने प्रकरणाचा निपटारा करता सामान्य जनतेस न्याय मिळावा यासाठी वेळावेळी लोक अदालतीचे आयोजन करण्यात येते.

त्याच धर्तीवर सामान्य शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते/पाणंद रस्ते मोकळे करुन लवकर न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा, यासाठी प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी तालुकास्तरावर सस्ती अदालत आयोजित करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने शुक्रवार, दि. २३ मे, २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत या कालावधीत सस्ती अदालतीचे कामकाज सुरु राहणार आहे. जिल्ह्यातील सर्व तालूक्यात सस्ती अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी गरजु शेतकऱ्यांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधीत तालुक्याचे तहसिलदार यांच्याशी संपर्क साधून या उपक्रमाचा जास्तीत-जास्त सामान्य, गरजु शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# देशातील १०३ रेल्वे स्थानकांचे पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते लोकार्पण

## छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसचा होणार पुनर्विकास - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई -** अमृत भारत स्थानक योजनेतून मुंबई शहराचे वैभव आणि युनेस्को जागतिक वारसास्थळ असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इमारतीचा पुनर्विकास करण्यात येणार असून यासाठी दोन हजार आठशे कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

अमृत भारत रेल्वे स्टेशन योजनेतून पुनर्विकसित करण्यात आलेल्या देशातील १०३ रेल्वे स्थानकांचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज लोकार्पण झाले. बिकानेर येथे आयोजित या कार्यक्रमामध्ये राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री श्री.फडणवीस परळ रेल्वे स्थानक येथून दूरदृष्य प्रणालीद्वारे सहभागी झाले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांशी कार्यक्रम ानंतर संवाद साधला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, वंदे भारत रेल्वे, नमो भारत रेल्वे, अमृत भारत रेल्वे अशा रेल्वेच्या माध्यमातून भारतीय रेल्वेचा कायापालट होत आहे. जर्मनीच्या रेल्वे जाळ्यापेक्षा जास्त लांबीचे रेल्वेचे जाळे प्रधानमंत्री मोदी यांच्या मार्गदर्शनात मागील ११ वर्षात उभारले आहे. विमानतळांच्या धर्तीवर सर्व रेल्वे स्थानकांचा विकास करण्यात येत आहे. विमानतळ परिसरात उपलब्ध असलेल्या अत्याधुनिक सोयी सुविधा या अमृत भारत रेल्वे स्टेशनच्या माध्यमातून आता सर्वसामान्य नागरिकांसाठीही उपलब्ध असणार आहेत. मुंबईतील परळ, चिंचपोकळी, माटुंगा आणि वडाळारोड या उपनगरीय स्थानकांसह राज्यातील १५ स्थानकांचा पुनर्विकास पूर्ण झाला असून त्याचे लोकार्पण करण्यात आले. जगातील आधुनिक रेल्वे प्रणालीमध्ये आता भारतीय रेल्वेचा समावेश होत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.




## महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांची आज भाजपा जिल्हा कार्यालयात संवाद बैठक



**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री मा.ना. श्री. संजयजी सावकारे हे दिनांक २३ मे २०२५ रोजी जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्याच्या निमित्ताने ते भारतीय जनता पक्षाच्या जालना जिल्हा कार्यालयात भेट देणार असून, सकाळी १०.०० वाजता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नेत्यांसोबत एक संवाद बैठक घेणार आहेत. या बैठकीला माजी केंद्रीय मंत्री तथा भाजपा नेते रावसाहेब दानवे, माजी मंत्री आ. बबनराव लोणीकर, जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ. नारायण कुचे, आ.संतोष दानवे यांची उपस्थिती राहणार आहे.

या बैठकीत पक्षाची संघटनात्मक घडामोडी, जिल्ह्यातील वस्त्रोद्योग विकासाचे प्रश्न, स्थानिक समस्या व जनतेच्या अपेक्षा याबाबत सविस्तर चर्चा होणार आहे. तसेच, सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यावेळी उपस्थित राहून आपल्या सूचना, मतप्रदर्शन आणि विचार मांडावेत असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी केले आहे.

## नोटरी रिनिवल त्वरीत करण्यासाठी केंद्रीय मंत्रीशी चर्चा करणार - ॲड. सिकंदर अली

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र ॲण्ड गोवा नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. सिकंदर अली व जिल्हा कार्याध्यक्ष ॲड. महेश धन्नावत महाराष्ट्र व जालना जिल्ह्यातील नोटरी यांचे रिनिवल अनेक दिवसांपासुन प्रलंबीत आहे. त्यासंदर्भात थेट केंद्रीय कायदा मंत्री व सचिव यांच्याशी चर्चा करून नोटरी रिनिवल त्वरीत व्हावे याबाबत पाठपुरवठा करणार आहे. तरी ज्या नोटरींचे रिनिवल अद्यापी झालेले नाही, त्या लोकांनी अँड. सिकंदर अली यांच्याशी जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष किंवा अँड. धन्नावत यांच्याशी संपर्क करावे, असे आवाहन अँड. धन्नावत यांनी केले आहे. नोटरी हे लोकांना सेवा देतात व नोटरी सुविधा सतत देतांना जर त्यात खंड फक्त रिनिवल मुळे पडले तर लोकांना त्याचा त्रास सहन करावा लागत असल्याने नोटरी रिनिवल त्वरीत व्हावे यासाठी महाराष्ट्र न्ड गोवा नोटरी असोसिएशन प्रयत्नशील असल्याची माहिती अँड. सिकंदर अली यांनी दिली अहे.

## महाराष्ट्र भूषण समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख यांचे कीर्तन

**विरार । प्रतिनिधी -** वारकरी परंपरेत आध्यात्मिक ओढ,भक्तिभाव आणि सामूहिक साधनेचा प्रसार करणाऱ्या श्री समर्थ कृपा भजन मंडळ,नालासोपारा (विरार)यांच्या वतीने १५ वा वर्धापन दिन रविवार,८ जून २०२५ रोजी साजरा होणार असून,या दिवशी म हाराष्ट्र भूषण समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज देशम ुख यांचे श्रवणीय,प्रभावी आणि समाजमनाला जागं करणारे कीर्तन भक्तजनांना मोरेश्वर विद्यालयाजवळ,म ोरेगाव नाका,विरार रोड,नालासोपारा (पूर्व),ता. वसई,जि.पालघर येथे आयोजन केले आहे.

संतांची शिकवण आणि भक्तीचा सोहळा या संकल्पनेतून हा कार्यक्रम सजलेला असून,दिवसभर आध्यात्मिक,सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.यावेळी दिवसभराचा कार्यक्रम :सकाळी ६.०० वा.-श्री सत्यनारायण म हापूजा,सकाळी ८.०० वा. -दीपप्रज्वलन व सामूहिक पालखी सोहळा,स.९.४३ वा.-विशेष गाडी वेळ - विरार ते चर्चगेट दुपारी - पंचपदी परीक्षक सत्कार,नंतर भव्य भजन स्पर्धा स्पर्धा वैशिष्ट्ये १५० पेक्षा अधिक भजन मंडळांचा सहभाग,YouTube Live प्रसारण,दुपारी - स्नेहभोजन,हळदी-कुंकू समारंभ, सायं.५.०० वा.- ह.भ.प. निवृत्तीमहाराज देशमुख यांचे प्रबोधनात्मक कीर्तन, रात्रौ ७.१५ वा.-मान्यवर सत्कार व भजन स्पर्धेचे बक्षीस वितरण

या कार्यक्रमा साठी संत सेवा भजन सामाजिक संस्था,संत ज्ञानेश्वर माऊली भजन संस्था यांसह अनेक नामवंत मंडळे सहभागी होणार असून,सामाजिक,शैक्षणिक आणि आध्यात्मिक कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात येणार आहे

अध्यक्ष - अरविंद मोरे, संस्थापक - ह.भ.प.विश्वनाथ बांद्रे, कार्याध्यक्ष - प्रणव लांबाडे, जनार्दन शिंदे, गजानन जोशी, राजेश येले, राजुदादा पाडावे, अनिल बेकरे, सचिन धाडवे, सत्यवान केसरकर, संदीप तावडे, सुनील पांढरे व इतर कार्यकर्ते कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व पदाधिकारी व सदस्य अत्यंत नियोजनपूर्वक तयारी करत असून,श्री समर्थ कृपा भजन मंडळा तर्फे सर्व वारकरी भक्त,भजनप्रेमी आणि श्रद्धावंत भाविकांना या भक्तिरसात न्हालेल्या सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भक्ती, कीर्तन, आणि संतांची शिकवण यांचा संगम अनुभवण्यासाठी आपण उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्ह्याला यलो अलर्ट; सोसाट्याचा वारा, पावसाची शक्यता

### नागरिकांना दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्ह्यात दि. २२ मे, २०२५ रोजी यलो (धशश्रश्रे) अलर्ट जारी केला असुन, जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा (ताशी ४०-५० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. तसेच दि. २३ मे, २०२५ रोजी ढगांच्या गडगडाटासह हलका पाउस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. दि. २४ व २५ मे, २०२५ या कालावधीत विजेच्या कडकडाटासह हलका व मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली आहे. या पार्श्वभूम ीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्ह्यातील नागरीकांना खालीलप्रमाणे दक्षता घेणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चम कत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/सायकल यांचेपासून दूर रहावे,मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रॉन्सफोर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अर्थातरी लटकणाऱ्या / लोंबणाऱ्या तारांपासून दूर रहावे. वीजा चमकत असताना म ोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा. अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी,जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

सर्व नागरीकांनी वादळी वारे, वीज पासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधाण्याचे आवाहजन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गणेश महाडिक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## महावितरणचा गलथान कारभार नागरीकांच्या जिवितावर बेतणार?

### चंदनझीरा भागात विद्यूत तार घराच्या पत्र्यावर लोंबकळल्या

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील चंदनझीरा स्थित सिद्धिविनायक नगरच्या पाठीमागील कालनीमध्ये वादळीवाऱ्याने विद्युत खांब झुकल्याने विद्युत वाहक तारा नागरिकांच्या घराच्या पत्र्यावर लोंबकळल्या आहेत.या तारांमध्ये सध्या विद्युत पुरवठा चालू असून नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण आहे. मागील तीन दिवसापासून विद्युत खांब वादळी वाऱ्याने झुकलेला आहे त्यामुळे विजेच्या तारा नागरिकांच्या पत्राच्या घरावर लोंबकळले असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.म हावितरणचा कारभार अतिशय गलथान झाला असून नागरीकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला असल्याचे नगरीकांनी आज दि.२२ गुरुवार रोजी सायंकाळी सहा वा. च्या सुमारास माध्यमांशी बोलताना सांगीतले.

सदरील गल्लीतील नागरिक तीन दिवसापासून म हावितरणच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना ही बाब सांगत असून कोणीही याकडे लक्ष द्यायला तयार नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. सदरील परिसर हा ग्रामीणमध्ये येत असून कन्हैया नगर येथील कार्यालय या भागाशी संबंधित आहे. तीन दिवसापासून भयभीत असलेले नागरिक वारंवार संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना फोन लावत आहेत परंतु कोणीही याकडे लक्ष द्यायला तयार नसल्याने या भागातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

पान १ वरुन

### ऊन पाऊस ...

व्यवसाय करणाऱ्या लाभार्थ्यांना निश्चितच ऊन आणि पावसापासून संरक्षण मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. सचिव अनया अग्रवाल म्हणाल्या की, या उपक्रमासाठी क्लबच्या सदस्यांचे भरून योगदान लाभले आहे. प्रत्यक्ष रस्त्यावर निरीक्षण करून लाभार्थींची निवड केली आहे. प्रास्ताविकपर भाषणात उपाध्यक्ष उमेश बजाज यांनी लाभार्थ्यांनी मिळालेल्या छत्र्यांचा वापर करून आपले आरोग्य जपावे असे आवाहन केले आणि सुंदर व स्वच्छ जालना या अभियानात क्लबचा सक्रिय सहभाग असावा, यादृष्टीने एखादा परिसर विकसित करण्यासह तिथे बसण्यासाठी बैठक व्यवस्था करण्याचा म नोदय बोलून दाखवला.

छत्र्यांसाठी आर्थिक योगदान देणारे रविंद्र हुशे, राजेंद्र अग्रवाल, जितेंद्र गर्ग, प्रदीप भारजवाल, उमेश बजाज, अनया अग्रवाल, डॉ. प्रल्हाद उढाण, गणेश बाले, विजयालक्ष्मी बाले, शरद गादिया, संगीता गादिया व गिरधर लधानी व यावर्षी पोलिओ निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय रोटरीला १०० डॉलर तर विविध सेवा प्रकल्पासाठी ४१४ डॉलर देणगी दिल्याबद्दल पोल हॅरीस फेलोसाठी पात्र ठरलेले राजेंद्र अग्रवाल, प्रकल्प प्रमुख जितेंद्र गर्ग, डॉ प्रल्हाद उढाण, संगीता गादिया, विनोद बरवार व संचालक रुक्मीनीकांत दिक्षीत यांचा प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

### जीवाभावाचा सहकारी ...

शांत आणि सकारात्मक राहणे, सर्वांशी समान वागणूक देणे आणि योग्य गोष्टींसाठी ठामपणे उभे राहणे, हे त्यांचे वैशिष्ट्य होते. स्व. चौधरी यांनी इतरांच्या भावना, मतं आणि संस्कृतीचा सन्मान करत नेहमी समाजाच्या भल्यासाठी कार्य केले, असेही लोणीकर यांनी नमूद केले.

या सांत्वनपर भेटीवेळी घनसावंगी विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते विश्वजीत विलासराव खरात, माजी नगराध्यक्ष गेवराई महेश आण्णा दाभाडे, भाजपा किसान मोर्चाचे अंकुशराव बोबडे, शहादेवराव आवटे, अनिरुद्ध झिंजुर्डे, नजीर शहा टेलर, बंडू आराध्य, कैलास दादा पवार, नारायण आडाणी, रामेश्वर राव गरड, प्रल्हादराव भालेकर, सचिन मोटे, शहादेव औटे, गजेंद्र चौधरी, माजी सरपंच रघुनाथ चौधरी, पांडुरंग चौधरी, सरपंच राहुल चौधरी यांच्यासह गावातील शेकडो प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. या सर्वांनी स्व. चौधरी यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

स्व. मुरलीधरआण्णा चौधरी यांनी भारतीय जनता पक्षाच्या जालना जिल्ह्यातील संघटनात्मक कार्यात मोलाचे योगदान दिले होते. त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने अनेक यशस्वी मोहिमा राबवल्या आणि कार्यकर्त्यांना प्रेरणा दिली. त्यांच्या सामाजिक कार्यामुळे आणि लोकांशी असलेल्या जवळच्या नात्यामुळे ते सर्वांच्या आवडीचे नेते होते. त्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणारी नाही, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

स्व. मुरलीधरआण्णा चौधरी यांच्या निधनाची बातमी सम जताच जालना जिल्ह्यातील भाजपा कार्यकर्त्यांमध्ये शोककळा पसरली. अनेकांनी सोशल मीडियावर आणि वैयक्तिकरित्या त्यांना श्रद्धांजली वाहिली. आपेगाव येथील सांत्वनपर भेटीवेळी स्व. चौधरी यांच्या आठवणींना उजाळा देत आमदार बबनराव लोणीकर यांनी त्यांच्या साधेपणाचे आणि समाजसेवेचे कौतुक केले.

आमदार बबनराव लोणीकर यांनी स्व. चौधरी यांचे विचार आणि आदर्श पुढे नेण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला. ते म्हणाले, स्व. मुरलीधरआण्णा यांनी दाखवलेल्या मार्गावर चालत आम्ही त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहोत. पक्ष कार्यकर्त्यांनीही स्व. चौधरी यांच्या कार्याला स्मरून सम ाजसेवा आणि पक्ष संघटन मजबूत करण्याचा निर्धार केला. स्व. मुरलीधरआण्णा चौधरी यांच्या आत्म्याला शांती लाभो, अशी प्रार्थना सर्वांनी केली.

### मनपातील टेंडरच्या ...

प्रियंका राजपूत यांनी एकाच वर्तमानपत्रात जाहीरात देऊन खोतकर यांच्या लोकांना खूश केल्याचा आरोप गोरंटयाल यांनी केला. खोतकर यांच्या बंगल्यावरून जसं डमरू वाजेल तसं राजपूत काम करत असल्याचे सांगत गोरंटयाल यांनी राजपूत यांच्या मनमानी कारभारावर जोरदार टीका केली.

राजपूत यांची नगरविकास विभागाकडे तक्रार करणार असल्याचा ईशारा देखील गोरंटयाल यांनी दिला.

## अकरावी प्रवेश प्रक्रिया २६ पासून होणार ऑनलाईन

मुंबई : राज्यातील उच्च म ाध्यमिक बोर्डाकडून ११ वीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचा गोंधळ संपता संपेना झालाय. शिक्षण संचालनालयाकडून अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी आता नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. त्यानुसार, अकरावीच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश २६ मे पासून सुरू होणार असून पहिली फेरी प्रत्यक्षात तेव्हाच सुरू होईल. त्यामुळे, गेल्या २ दिवसांपासून ऑनलाईन प्रवेशासाठी धडपड करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणखी ४ दिवस थांबावे लागणार आहे. २१ मे रोजी बुधवारी प्रत्यक्षात सुरू होणारी ऑनलाइन अकरावी (ड्डउ ीर्शीश्री) प्रवेशाची प्रक्रिया वेबसाईट मधील तांत्रिक अडचणीमुळे सुरू होऊ शकली नाही. त्यानंतर, आता महाराष्ट्र शिक्षण महामंडळाकडून २६ मे ही नवी तारीख देण्यात आली असून २६ मे ते ३ जूनपर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश घेता येईल.

राज्य शिक्षण म हामंडळाने दिलेल्या नव्या वेळापत्रकानुसार, २६ मे ते ३ जूनपर्यंत म्हणजे ९ दिवस ११ वी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू राहणार आहे. त्यानंतर, ५ जून रोजी पहिली जनरल मेरीट लिस्ट लागणार आहे. ६ ते ७ तारखेपर्यंत विद्यार्थ्यांना आपल्या हरकती नोंदवून तक्रार करता येईल. त्यानंतर, ८ जून रोजी अंतिम जनरल मेरीट लिस्ट जाहीर होईल.

**२६ मे पासून ऑनलाइन प्रवेश, नोंदणी**

राज्यात शासनाची वेबसाईट सुरू होताच अनेक विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्यानंतर अडचणींचा सामना करावा लागला. त्यामुळे, आता ही प्रवेश प्रक्रियाच पुढे ढकलण्यात आली आहे. आता ही प्रवेश प्रक्रिया सोम वारपासून म्हणजेच दिनांक २६ मे पासून सुरू होणार आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना २६ मे ते ३ जून दरम्यान आपल्या पसंतीचे कॉलेज क्रमांक निवडता येतील, त्यासोबतच संपूर्ण अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचा अर्ज भरता येणार आहे. तर, अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची पहिली गुणवत्ता यादी १० जूनला जाहीर होईल, अशी माहिती महामंडळाकडून देण्यात आली आहे. दरम्यान, याप्रूवी २१ मे रोजी सुरू करण्यात आलेली विद्यार्थी नोंदणी आणि पसंतीक्रम भरण्याची सुविधा पहिल्या फेरीसाठी २८ मे २०२५ पर्यंत सुरू राहणार होती. मात्र, ती प्रक्रिया रद्द झाली असून नव्याने वेळापत्रक जाहीर करण्यात आलं आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला आवश्यक वेळ देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. प्रवेशाचे वेबपोर्टल मोबाईलद्वारे हाताळताना अधिक सुलभ व्हावे यासाठी काही वेळासाठी पोर्टलची सुविधा बंद ठेवण्यात आली आहे, असे बोर्डाकडून सांगण्यात आलं आहे. तसेच, विद्यार्थी आणि पालकांनी गोंधळून जाऊ नये. साईट सुरू झाल्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या अपडेट देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या व्हॉट्स अप चॅनेलवर आपल्याला लगेच माहिती देण्यात येईल, असेही शिक्षण संचालनालयाने म्हटलं आहे.

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या वेबसाईट मध्ये तांत्रिक अडचणी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात अडचणी येत आहेत. अकरावी प्रवेश प्रक्रिया यंदा पहिल्यांदाच संपूर्ण राज्यात ऑनलाइन पद्धतीनं राबविण्यात येतेय. त्यामुळं एका अर्जातच राज्यभरातील महाविद्यालयांतील प्रवेशाचा पर्याय उपलब्ध झालाय. मात्र, पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेशाच्या संकेतस्थळावर तांत्रिक अडचणी येत असल्याने विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करता येत नाहीये. यावर शिक्षण संचालनालयकडून ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरळीत करण्यासंदर्भात काम सुरू आहे

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभाविपचे 'ग्रामानुभूती' शिबिर

**जालना । प्रतिनिधी** - वर्षभराचा अभ्यास, परीक्षा, क्लास इत्यादी च्या तणावातून थोडे मोकळे होत आपल्या व्यक्तिमत्व विकासासाठी घर- पालक व शाळा महाविद्यालयापासून दूर निसर्गाच्या सानिध्यात विद्यार्थ्यांनी काही दिवस घालावे व त्यांच्यातील सुप्त कलागुणांना बाहेर काढण्यासाठी विद्यार्थी परिषद नेहमीच वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम आयोजित करत असते. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक २३, २४ व २५ में रोजी प्रभू श्रीरामाच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत श्रीक्षेत्र नांगरतास तालुका मंठा या ठिकाणी निसर्गरम्य वातावरणामध्ये ' ग्रामाणुभूती उन्हाळी सुट्टी शिबिरा'चे आयोजन करण्यात आले आहे.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद गेल्या ७६ वर्षापासून शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात अविरतपणे कार्य करीत आहे. अभाविपने विविध आंदोलन, कार्यक्रम व उपक्रमाच्या माध्यमातून समाजामध्ये आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ही सतत विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करत असते. दरवर्षी मे महिन्यामध्ये महाविद्यालय व विद्यार्थ्यांना सुट्ट्या असल्या कारणाने विद्यार्थी परिषद ग्राम अनुभूती शिबिर आयोजित करत असते.

या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन ,जंगल भ्रमंती, वनभोजन, श्रमदान, ग्रामीण खेळ, कॅम्प फायर, मुलाखत सत्र, सांस्कृतिक कार्यक्रम, वादविवाद स्पर्धा, पथनाट्य ,ग्रामीण जीवन अनुभव आणि बरच काही शिकवल्या जाणार आहे. नोंदणीकृत सहभागी विद्यार्थ्यांना जालना ते मंठा प्रवास, टी-शर्ट व सर्व व्यवस्था विद्यार्थी परिषद मोफत करणार आहे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी कि रोल ठरणारे हे शिबिर नुकतेच दहावी- बारावी च्या परीक्षेतून बाहेर पडलेले व १६ ते २५ वर्ष वयाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी साठी आयोजित केले आहे. तरी जालना जिल्ह्यामधील विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी करून शिबिरातील आपला सहभाग नक्की करावा असे आवाहन शिबिर प्रमुख लहू किंगरे मो क्र. ८२६२९२४०३९ , गणेश बोंडे मो. ८६००२१४८९९ व पवन नरवडे मो. ७८२२०८६२०६ यांनी केले आहे.

नोंदणीसाठी खालील लिंकचा वापर करावा. https://surveyheart.com/form/681f94f7aaf08e26a56226d2







हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.